**महाराष्ट्र शासन**

क्र. जीपीडीपी २०१५/ प्र.क्र.३८/ पं.रा.६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई – ४०० ००१.
दिनांक : ०८ जून २०१६.

प्रति,

१) राज्य प्रकल्प संचालक,
राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान,
पुणे.

२) संचालक,
राज्य ग्रामीण विकास यंत्रणा,
यशदा, पुणे.

**विषय: राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA) योजना, "आमचं गाव, आमचा विकास" कार्यक्रमाच्या मार्गदर्शन सुचनांमध्ये प्रकरण ६ मुद्दा क्रमांक ६.१.२.६ / ६.१.१.६/ ६.१.२.२ बाबत स्पष्टीकरण.**

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्रमांक: जीपीडीपी २०१५/ प्र.क्र.३८/ पं.रा.६, दिनांक ०४.११.२०१५
२) आपले पत्र रागांपंसअ/ आ.गा.आ.वि. / ७४५/ २०१५, दिनांक २५ मे, २०१६.

महोदय,

वरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, १४व्या वित्त आयोग अंतर्गत, **"आमचं गाव, आमचा विकास"** या उपक्रम अंतर्गत ग्रामपंचायत विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांमधील प्रकरण ६ मुद्दा क्रमांक ६.१.२.६ / ६.१.१.६/ ६.१.२.२ बाबत स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ६.१.२.६ बाबत:-** वार्षिक विकास आराखडा तयार करतांना खालीलप्रमाणे विभागनिहाय निधीचे नियोजन करणे आवश्यक राहील.

१. महिला व बाल कल्याण : १०%

२. अनुसुचित जाती/ जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात.

३. आरोग्य, शिक्षण, (Livelihood) : २५%

ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी विभागनिहाय टक्केवारीची तरतूद फक्त १४व्या वित्त आयोगाच्या निधीसाठी लागू राहील.

... ... ... (P.T.O.)

**मुद्दा क्रमांक ६.१.१.६ आणि मुद्दा क्रमांक ६.१.१.२ बाबत:-**

ग्राम पंचायत पंचवार्षिक विकास आराखडा तयार करतांना एकूण उपलब्ध होणा-या निधीच्या दुप्पट व वार्षिक विकास आराखडा तयार करतांना दिडपट निधी विचारात घेणे नमूद केले आहे.

याबाबत ग्राम पंचायतींना उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून प्राप्त होणा-या निधीमध्ये वाढ (दुप्पट वा दिडपट) न करता मूळ तरतुदीनूसार आराखडा तयार करण्यात यावा. फक्त १४व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणा-या निधीच्या दुप्पट निधी पंचवार्षिक आराखडयासाठी व दिडपट निधी वार्षिक आराखडा तयार करतांना विचारात घेण्यात यावा, असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

(चंद्रकांत बळीप)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :- कार्यासन पं.रा.-६ (संग्रहार्थ)